# SCHOLARS IMPACT

Quarterly

International Multidisciplinary Multilingual
Journal of Contemporary Research

Vol. 6 | Special Issue 1 | March 2019

ISSN 2394 - 7632
EISSN 2394 - 7640

Special Issue

UGC Approved
Journal No- 41129

IMPACT-FACTOR - 5.98



Special Issue on

# MAHATMA GANDHI
## IN THE CHANGING TIMES

(Book 2)

✣ EDITOR IN CHIEF ✣

DR. M. RAGHIB DESHMUKH

Issue Editors

Dr. Ramkishan Bhise
Dr. Digambar Rode
Mr. Hanuman Wankar

Scanned with CamScanner

| | | |
|---|---|---|
| 32. महात्मा गांधी यांनी मांडलेला महीलोन्नतीचा विचार | अनुप अरुण नांदगावकर | 82 |
| 33. म. गांधीजीचे लोकशाहीभिमूख ग्रामस्वराज्य | डॉ. बी.ए. निर्मळ | 85 |
| 34. महात्मा गांधी यांचे आर्थिक विचार व आजचा ग्रामीण भारत | पाटील सुभाष लक्ष्मण | 87 |
| 35. महात्मा गांधी व सत्याग्रह सिध्दांत | डॉ. पाटील विनायक उध्दवराव | 90 |
| 36. लोकशाही आणि सु–शासन | डॉ.मीरा विठ्ठलराव फड | 93 |
| 37. गांधीजींच्या शैक्षणिक प्रयोगाची विशेषत: एक दृष्टिक्षेप | डॉ. कालिदास दिनकर फड<br>डॉ. सतोष काकडे | 96 |
| 38. महात्मा गांधीच्या विचारातील खेडे : एक अभ्यास | डॉ. टि. डी. राजगुरे | 98 |
| 39. महात्मा गांधीजींचे स्त्रीमुक्ती विषयक विचार | रकटे ज्योती भाऊसाहेब | 101 |
| 40. महात्मा गांधीचे आर्थिक विचार | डॉ. सुरेश सामाले | 103 |
| 41. महात्मा गांधीजींचा ग्रामीण विकासाचा दृष्टिकोन | डॉ. भगवान सांगळे | 106 |
| 42. म. गांधी आणि भारतीय स्वातंत्र्य संग्राम : एक अध्ययन | डॉ. शिंदे आर.डी. | 110 |
| 43. महात्मा गांधी यांचे सर्वोदय, खादी ग्रामोद्योग व स्वदेशी संबंधी विचार | डॉ. टि.जी. सिराळ | 114 |
| 44. राष्ट्रसंत तुकडोजींच्या साहित्यातील 'गांधीविचार' | डॉ. अनंत सूर्यभान सूर्यकार | 117 |
| 45. महात्मा गांधी यांच्या विचारांचे ग्रामीण विकासातील योगदान | तोंडारे विजय नागनाथ | 121 |
| 46. महात्मा गांधीचे स्त्री विषयक विचार | डॉ.अलका प्रदीप वालचाळे (सरोदे) | 123 |
| 47. गांधीजीच्या ग्रामीण विकासाचे विचार वर्तमान परिस्थितीत उपयोगी | ए. एम. वानखडे | 125 |
| 48. महात्मा गांधीचा 'स्त्री' विषयक दृष्टिकोन : चिकित्सक विश्लेषण | शितल रुद्रमुनी येरुळे | 127 |
| 49. म.गांधीजींचा ग्रामीण विकासाचा दृष्टीकोन | डॉ.आहिरे भास्कर मुरलीधर | 130 |
| 50. महात्मा गांधीचा ग्रामीण विकासाबद्दलचा दृष्टीकोण | डॉ. चव्हाण बी.एम. | 132 |
| 51. महात्मा गांधी आणि ग्रामीण विकास | अर्चना कुंडलिकराव चवरे | 134 |
| 52. गांधीजींच्या विचारांची उपयुक्तता | डॉ. आर.के. काळे | 136 |
| 53. आजचे भारतीय राजकारण व गांधी विचारांची प्रासंगिकता | डॉ. राठोड डी.बी. | 138 |
| 54. महात्मा गांधी यांचे शिक्षण विषयक विचार | कल्याण दत्तात्रय यादव | 140 |
| 55. उपोषण अस्त्र : गांधीना आहार व आरोग्य व्यवस्थापनाचा आधार | उमेश रामचंद्र साडेगावकर | 142 |




Scanned with CamScanner

52.

# गांधीजींच्या विचारांची उपयुक्तता

**डॉ. आर.के. काळे**
राज्यशास्त्र विभाग प्रमुख व संशोधन मार्गदर्शक
बलभीम महाविद्यालय, बीड.

**प्रस्तावना :** २१ व्या शतकात मानवाने बऱ्याच क्षेत्रात नेत्रदिपक प्रगती केली आहे. सर्व भौतिक सोयी सुविधा उपलब्ध झाल्या. मात्र मानवाने शांतता सुख व आनंद गमावला आहे. भारत हा शेतीप्रधान देश आहे. आजही जवळपास ६३% लोक शेती व शेती व्यवसायाशी निगडीत आहेत. देशाला स्वातंत्र्य मिळुन ६५ वर्षे होऊन गेले आहेत. मात्र हजारो शेतकरी आपल्या गळयाला फास लावुन जीवन संपवत आहेत. तर दुसरीकडे उद्योगपती विजय मल्या ९००० कोटी रुपये घेवुन परदेशी गेला आहे. याप्रमाणे अनेक प्रश्न व समस्या जगात व भारतात आहेत. माणसाला माणुस म्हणुन जगण्याचा अधिकार हिरावुन घेतला जात आहे. यातुनच नक्षलवाद, दहशतवाद यासरख्या समस्या निर्माण झाल्या आहेत. या सर्व प्रश्नावर आशेचा किरण म्हणुन आपल्याला गांधीजींच्या विचाराकडे बघता येईल.

आज जगात व भारतात अनेक समस्या निर्माण झाल्या आहेत, सामाजिक, राजकीय आर्थिक, सांस्कृतीक, धार्मिक, पर्यावरणीय दहशतवाद स्त्रीयांचे प्रश्न या अनेक समस्या निर्माण झालेल्या आहेत. जगामध्ये नैतिकतेचा ऱ्हास होत चालला आहे. व्यक्तीपासुन ते आंतरराष्ट्रीय पातळीपर्यंत फक्त स्वार्थाचा विचार केला जात आहे. त्यामुळे अनेक प्रकारच्या विशमता निर्माण झाल्या व त्या विशमतेतुन अनेक प्रश्न निर्माण झाले. भारतातील व जगातील विचारवंतानी वरील समस्यावर गांधीचे विचार उपयुक्त ठरु शकतात. संयुक्त राष्ट्र संघटनेने २ ऑक्टोबर हा आंतरराष्ट्रीय शांततादीन जाहिर केला आहे. भारतात गांधीच्या तत्वानुसार स्वच्छ भारत मिशन व मेड इन इंडिया या योजना राबवल्या जात आहेत. खालील पध्दतीने काही प्रश्नाच्या संदर्भात गांधीचे विचारांचा अभ्यास करता येईल.

**भारतातील ग्रामीण भागातील प्रश्न :** भारतामध्ये गांधीजीच्या नावात राजकीय पक्षांनी सत्ता मिळवली. परंतु गांधीजींना हवे असलेले ग्राम स्वराज्य निर्माण झाले नाही. आज खेडयांची स्थिती अत्यंत दैनीय आशी झाली आहे. अस्वच्छता बेरोजगारी, गुणवत्ता धारक शिक्षणाचा अभाव, व्यसनाधिनता, दारिद्रय हे प्रश्न निर्माण झाले आहेत. शेती व्यवसाय हा जुगार बनला आहे. त्यामुळे बोटावर मोजण्याइवढीच खेडी आदर्श बनली आहेत. हजारो कोटी योजनेवर पैसा खर्च केला मात्र परिस्थीती जैसे थीच आहे. म्हणुन गांधीजीनी जे ग्राम स्वराज्य सांगीतले होते. ते स्वयंपुर्ण असे होते. त्या प्रत्येकाने आपल्या आरोग्याची व स्वच्छतेची काळजी घेतली पाहिजे. स्वच्छ पिण्याचे पाणी व मोफत आरोग्य सुविधा यावर भर दिला होता. भारत हा कृषि प्रधान देश असल्यामुळे गुरांची व गायींची जोपासना केली पाहिजे. प्रत्येकाला रोजगार प्राप्त झाला पाहिजे. त्याने खादी व्यवसाय सांगीतला होता व शेतीवर आधारीत छोटे छोटे व्यवसाय केले पाहिजेत. ग्रामपंचायतीने प्रमाणीकपणे व उद्यमशिलता व यांचे पुर्नजीवन करणे हे कार्य आहे. या पध्दतीने सर्वसंपन्न व समस्यायुक्त खेडयांचे स्वप्न पुर्ण करण्यासाठी गांधीच्या विचारांची आवश्यकता आहे.

**आर्थिक समस्या :** आज जागतिकीकरण, खाजगीकरण, उदारीकरण याच्या नावावर जगातील बडी रास्त व भांडवलदार, जगावर आर्थिक साम्राज्यवाद निर्माण करुन संपत्तीचे केंद्रीकरण करत आहेत. यामुळे जगात अहिरे व नाहीरे हे दोन वर्ग निर्माण झाले आहेत. जगामध्ये ८०% लोकाकडे २०% संपत्ती व २०% लोकाकडे ८०% संपत्ती आशी परिस्थीती आहे. प्रत्येकजण आपल्या स्वार्थाचाच विचार करत आहे. जगातील बडया राष्ट्रांच्या स्वार्थी भुमिकेमुळे ग्लोबल वर्मीग सारख्या समस्या निर्माण झाल्या आहेत व जगावर दुष्काळाचे सावट निर्माण झाले आहे. यामुळे लाखो लोक मरणयातना भोगत आहेत. यातुनच गुन्हेगारी प्रवृत्ती वाढत आहे. इंग्रजीमध्ये एक मन आहे. A criminal are not born but theya are made एकीकडे अन्न पचविण्याचा प्रश्न आहे तर दुसरीकडे अन्न मिळविण्याचा प्रश्न आहे. यामुळे जगामध्ये अनेक राष्ट्रामध्ये अशांततेचे वातावरण निर्माण झाले आहे. याला पर्याय म्हणुन गांधीजी विश्वस्त संकल्पना याचा विचार केला जाऊ शकतो. त्यांनी भांडवलदारी व्यवस्थेला विरोध केला होता परंतु त्यांना सुधारण्याची ते संधी देतात. समाजातील कोणत्याही व्यक्तीचे उत्पन्न किती असावे यावर मर्यादा घालावी. प्रत्येकाने आपल्या गरजा मर्यादीत ठेवल्या पाहिजेत. साधी राहणी व उच्च विचार या पध्दतीने जीवन जगले पाहिजे. ते म्हणत तुम्ही करोडो रुपये खुशाल मिळवा पण लक्षात ठेवा की तुमची संपत्ती तुमची नाही ती लोकांची आहे. तुमच्या न्याय गरजा भागविण्यासाठी आवश्यक तुम्ही घ्या पण बाकीचे समाजासाठी वापरा या विचारांची अमलबजावणी झाली तर आर्थिक विषमता नष्ट होईल.

**शैक्षणिक समस्या :** प्रत्येक देशाची ओळख त्या देशामध्ये शिक्षण पध्दतीचा दर्जा कसा आहे यावरुन होत असतो. भारताला स्वातंत्र्य मिळुन बरीच वर्ष झालेली आहेत. शिक्षण व्यवस्था ही इंग्रज कालीनच चालु आहे. समाजाला व राष्ट्राला उपयुक्त ठरेल असे शिक्षण दिले जात नाही. शिक्षण व्यवस्थेमध्ये प्रचंड गोंधळ निर्माण झालेला आहे. विनाअनुदानित व तासिक तत्वावरील शिक्षकांची स्थिती गुलामासारखी झालेली आहे. विद्यार्थ्यामध्ये शिक्षणाबद्दल नैराश्य व अनास्था निर्माण झ ालेली आहे. या परस्थीतीमध्ये गांधीच्या विचारांचे महत्व आपल्याला दिसुन येते. स्वावलंबन व स्वयंपुर्णता ज्यातुन भावी जीवनाचा आधार व स्वत:ची भाकरी मिळवुन देणारे व त्यातुन चारित्र्य संवर्धन झाले पाहिजे या शिक्षणाचा विचार त्यांनी केला होता. गांधीनी स्थानिक भाषेतुन शिक्षण दिले पाहिजे तसेच चारित्र्य संपन्न व श्रध्दावान या



Scanned with CamScanner